(सोबत शासकीय विमा निधी, महाराष्ट्र राज्य यांचे **"शासकीय विमानिधी अंतर्गत शासनाच्या प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष नियंत्रणाखालील मालमत्तेच्या विमापत्रकांचे** दायित्व **रू.५०/- कोटी इतके ठेवून उर्वरित रक्कमेचा पुनर्विमा / सहविमा करणे"** या विषयाचे पत्र क्रमांक प्रविनि २३११/सहविमा/वित्त विभाग मंत्रालय/ फ, दिनांक १९.१२.२०११ ची प्रत सोबत जोडत आहे).

—·—·—·—·—·—·—

क्रमांक : १६/संकीर्ण/२०१२/शा ३११५४
तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३ महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र. १९६७,
मुंबई ४०० ००१.

दिनांक : ५/११/२०१२

प्रति,

१. **सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई.**
२. **सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी.**

**सहसंचालक,**
**तंत्र शिक्षण,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

**प्रत :- कार्यासन क्रमांक ४, ४अ, ६ व १२ मु.का. यांना मुंबई माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.**

प्र.क्र. विभाअ/आस्था/दायी व/२०१३/७०७
दि. १०/१/२०१३

सहसंचालक तंत्र शिक्षण,
प्रादेशिक कार्यालय, अमरावती.
आवक क्र. ५८२६ दिनांक १०/१/१३

प्रतिलिपी :- १६.१०.१२ रोजीच्या आस्थापनेकरिता (३ पाने)
(१) प्राचार्य शा. अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती.
(२) प्राचार्य शा. औद्योगिक [illegible] महा. अमरावती
(३) प्राचार्य शा. तंत्र निकेतन, अमरावती/खामगांव/यवतमाळ/वाशिम/मुर्तिजापूर
(४) डॉ. पंजाबराव देशमुख तंत्र निकेतन अमरावती
(५) [illegible] इन्स्टिट्यूट ऑफ [illegible]
सहसंचालक
तंत्र शिक्षण, अमरावती.

( सोबत शासकीय विमा निधी, यांचे क्र प्रिविनि-२३११/सहविमा/वित्त विभाग मंत्रालय/फ, दि. १९/१२/२०११ या पत्राची प्रत सहपत्रासह पाठविण्यात येत आहे.)

क्र:-इएसटी-२०१२/प्र.क्र.३६४/आस्था-१
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक- १६ ऑक्टोबर, २०१२

प्रति,
संचालक (महाविद्यालयीन शिक्षण), पुणे.
संचालक (तंत्र शिक्षण), मुंबई.
संचालक (व्यवसाय शिक्षण), मुंबई.
संचालक (व्यवसाय प्रशिक्षण), मुंबई
संचालक (ग्रंथालय), मुंबई.
संचालक (कला), मुंबई.

यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी प्रत अग्रेषित:-

उर्मिला जोशी
(उर्मिला जोशी )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

for Circulation among ROs MSBTE and Principals of Inst.

पत्र प्राप्त झाले
18 2012
आवक लिपिक
तंत्र शिक्षण संचालनालय
३, महापालिका मार्ग, मुंबई १.

तंत्रशिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई
नोंदणी क्र. 217.39958
दिनांक 18/10/2012

GRAM : VIMANIDHI
doihodmah@rediffmail.com
**Directorate of Insurance**
Maharashtra State
Griha Nirman Bhavan
(MHADA)
264, First floor
Opp. Kalanagar, Bandra (East)
Mumbai 400 051

सत्यमेव जयते

# शासकीय विमा निधी

महाराष्ट्र राज्य

(विमा अधिनियम, १९३८ नुसार नोंदणीकृत)

तार : विमानिधी
**विमा संचालनालय**
महाराष्ट्र राज्य
गृहनिर्माण भवन (म्हाडा)
२६४, पहिला मजला
कलानगरसमोर, वांद्रे (पूर्व)
मुंबई ४०० ०५१

दूरध्वनी : संचालक २६५९ १७ ८२/२६५९ २४ ६१ • कार्यालय : २६५९ ०६ ९०/२६५९ ०७ ४६ • फॅक्स नं. ०२२-२६५९ ०४ ०३/२६५९ २४ ६१

19 DEC 2011

क्र.प्रविनि २३११/सहविमा /वित्त विभाग मंत्रालय / फ़

प्रति,
मा. सचिव ,
महाराष्ट्र शासन,
उच्च तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.

विषय :- शासकीय विमानिधी अंतर्गत शासनाच्या प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष नियंत्रणाखालील मालमत्तेच्या विमापत्रकांचे दायित्व रु.५०/-कोटी इतके ठेवून उर्वरित रक्कमेचा पुनर्विमा /सहविमा करणे.

संदर्भ :- शासन निर्णय क्रमांक-विमासं-१०११ /प्र.क्र.१५ /विमा प्रशासन मंत्रालय मुंबई-४०००३२ दिनांक-२९ एप्रिल २०११. ( सोबत प्रत जोडली आहे.)

महोदय,

लोक लेखा समितीच्या शिफ़ारशीनुसार राज्य शासनाने वित्त विभागात शासकीय विमा निधीची सन १९५१ मध्ये स्थापना करुन सन १९७२ मध्ये विमा संचालनालय ही राज्यस्तरीय स्वतंत्र आस्थापना मुंबई येथे प्रशासकीय नियंत्रणाखाली निर्माण केली आहे. विविध शासन निर्णयानुसार राज्य शासनाच्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष नियंत्रणाखालील सर्वशासकीय /निमशासकीय विभाग, मंडळे, महामंडळे, प्राधिकरण, सार्वजनिकउपक्रम, विद्यापीठे, नगरपालिका, नगपरिषदा, महानगरपालिका, जिल्हा परिषदा तसेच सहकारी क्षेत्रातील सर्व प्रकारच्या संस्था उद्योगधंदे यांना शासकीय विमा निधीकडे थेट पध्दतीने/अथवा शासकीय विमा निधीच्या अनुमतीने सहविमा सेवा पध्दतीखाली त्यांच्या मालमत्तेचा दायीत्वाचा विमा उतरविणे वित्तिय शिस्तीची बाब म्हणून अनिवार्य करण्यात आलेले आहे.

२ शासकीय विमा निधीकडे थेट पध्दतीने विमा उतरविणे सोईचे नसेल तर शासकीय विमा निधीच्या मान्यतेने सार्वजनिक क्षेत्रातील विमाकंपनीकडे सहविमा सेवा पध्दतीखाली विमा उतरविता येतो. मात्र अशा प्रकरणात आपल्या अधिपत्याखालील सर्व विभागांना योग्य प्रकारे विमा संरक्षण/विमाछत्र मिळण्यासाठी शासकीय विमानिधीच्या अनुमतीने मालमत्तेचा दायीत्वाचा सहविमा सेवा पध्दतीखाली विमा उतरविल्यास शासन निर्णयाची अंमलबजावणी होऊन राज्य शासनाचे वित्तीय हितसंबंध जोपासले जाईल. व त्यामुळे राज्य शासनास विमा हप्त्याच्या स्वरुपात विनाक्रर महसूल प्राप्त होईल.

३ संदर्भांकित शासन निर्णयाद्वारे राज्य शासनाने प्रत्येक प्रकारच्या विमा पत्रकांत शासकीय विमा निधीची दायित्व मर्यादा रु.५०/-कोटी इतकी मर्यादीत ठेवलेली असल्यामुळे आपल्या अधिपत्याखालील सर्व विभागांना शासन निर्णयानुसार सहविमा सेवा पध्दतीखाली अन्य विमा कंपनीकडे मालमत्तेचा विमा उतरविण्यापूर्वी प्रत्येक प्रकारच्या विमा प्रस्तावासाठी शासकीय विमा निधीची मान्यता घेणे बंधनकारक आहे. शासकीय विमा निधीची मान्यता न घेता परस्पर अन्य विमा कंपन्याकडे मालमत्तेचा विमा सहविमा सेवा पध्दतीखाली उतरविल्यानंतर विमापत्राखाली विमादावा उद्‌भवल्यास विमा दाव्याची संपुर्ण जबाबदारी विमाधारक या नात्याने संबधीत विभागाची राहील. या पत्राव्दारे आपणास विनंती करण्यात येते की आपल्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व कार्यालयांना/आस्थापनांना शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी आदेश कृपया निर्गमित करावे.

आपला विश्वासू,

(ह. मा. देशपांडे)
विमा संचालक,
महाराष्ट्र राज्य,मुंबई.

सहपत्रः-दि.२९ एप्रिल २०११ चा शासन निर्णय.

शासकीय विमा निधी अंतर्गत शासनाच्या प्रत्यक्ष
अथवा अप्रत्यक्ष नियंत्रणाखालील मालमत्तेच्या
विमा पत्रकाचे दायित्व रु.५०/- कोटी इतके
ठेवून उर्वरित रक्कमेच्या पुनर्विमा/सह विमा करणे

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय क्रमांक :विमासं-१०११/प्र.क्र.१५/विमा प्रशासन
मंत्रालय,मुंबई ४०० ०३२
दिनांक २९ एप्रिल,२०११

संदर्भ: शासन पत्र क्र.विमासं-१००७/प्र.क्र.२८/विमा प्रशा,
दि.२९/९/२०१० व दि.२/१२/२०१०

**प्रस्तावना**

विमा संचालनालयाने शासकीय विमा निधी अंतर्गत विमा व्यवसायाकरीता सार्वजनिक उपक्रम व खाजगी विमा कंपन्यांचे एजंट कम सर्व्हिस प्रोव्हायडर कम को-इन्शुरर म्हणून नियुक्ती करण्यासाठीच्या निविदा प्रक्रिया अंतिम होईपर्यन्त सह विमा करु नये, तसेच शासनाच्या पूर्व मान्यतेखेरीज मोठया रक्कमेची विमा जोखीम स्वीकारण्यात येऊ नये असे संदर्भाधीन पत्रान्वये विमा संचालनालयास कळविण्यात आले होते. त्या अनुषंगाने शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय**

शासकीय विमा निधी अंतर्गत विमापत्रकाखाली मोठया रकमेची जोखीम स्वीकारल्यास व मोठया रकमेचा विमा दावा उद्भवल्यास शासकीय विमा निधीकडे विमा व्यवसायाच्या रुपाने जमा झालेली विमा रक्कम विमादाव्यामुळे एकाचवेळी खर्च होण्याची शक्यता आहे.यास्तव विमा क्षेत्रातील जोखीम विभागण्यासाठी सहविमा /पुनर्विमा पध्दती विचारात घेऊन शासकीय विमा निधीची प्रत्येक प्रकारच्या विमापत्रकाखाली महत्तम दायित्व मर्यादा रु.५०/- कोटी इतकी ठेवण्यात यावी. उर्वरित विमा जोखीम प्रचलित सह विमा /पुनर्विमा पध्दतीने विभागणे अनिवार्य आहे. ज्या जोखिमांमध्ये शासकीय विमानिधीचे अधिकतम नक्त दायित्व हे रु.५०/- कोटींपेक्षा कमी असेल त्या प्रकरणातही प्रचलित पद्धतीनुसार सह विमा/पुनर्विमा करण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र www.maharashtra. gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०११०५०४१४१११०७००१ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(कृ.शे.कांबळे )
उप सचिव, वित्त विभाग.

प्रति,
राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे व उपमुख्यमंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सहायक,
महालेखापाल (लेखा परीक्षा)-१ महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल (लेखा परीक्षा)-२ महाराष्ट्र, नागपूर,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१ महाराष्ट्र, मुंबई,

[ क. मा. प.